**प्रेसनोट** **दिनांक १८/०७/२०१९**

## डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर

### बालगंधर्व बिट मार्शल वरील कर्मचारी यांचे सतर्कतेमुळे नागरीकाचे प्राण वाचले.

---

दिनांक १४/०७/२०१९ रोजी श्री. शिंगाडे, पोशि ९९५२ व श्री डामसे पोशि ३९६८ यांना बालगंधर्व बिट मार्शलवर दिवसाळी डयुटी असतांना नियंत्रण कक्षाकडुन ओंमकारेश्वर मंदीर जवळील ब्रिज वरती एक इसम बेशुध्द अवस्थेत पडला आहे सदर ठिकाणी पोलीस मदतीचा कॉल प्राप्त होताच बालगंधर्व बिट मार्शल वरील कर्मचारी तात्काळ घटनास्थळी पोहचली. बेशुध्द अवस्थेत असलेल्या इसमास व त्याचे जवळ पडलेल्या विषारी औषधाच्या बॉटलसह रिक्षा मधुन ससुन हॉस्पीटल येथे घेवुन गेले. त्यास ॲडमिट करुन त्याचे नातेवाईकांचा तपास घेतला असता बेशुध्द इसमाचा चुलते गणेश खुडे यांच्याशी संपर्क साधुन त्यांना झाले प्रकाराबाबत माहिती देवुन त्यांना ससुन हॉस्पीटल, पुणे येथे तात्काळ बोलावुन घेवुन घेतले. बेशुध्द इसमाचे प्रकृती बाबत डॉक्टराकडे चौकशी केली असता त्यांचा धोका टळला आहे परंतु १० ते १५ मिनिट उशीर झाला असता तरी धोका निर्माण झाला असता आपले सतर्कतेमुळे त्यांचे प्राण वाचले आहेत असे डॉक्टरानी सांगितले. डॉक्टर व गणेश खुडे यांनी पोलीसांचे आभार मानले.